# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दिनांक ११ मे, २०२६

## जाहीर प्रकटन

एन.डी.टीव्ही मराठी या वृत्तवाहिनीवर ''सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राध्यापक भरतीमध्ये कोट्यावधींचा आर्थिक गैरव्यवहार'' या मथळ्याखाली वृत्त प्रसारित करण्यात आल्याचे दिनांक ९ मे, २०२६ दरम्यान विद्यापीठाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. अशाच आशयाचे वृत्त या चॅनलच्या संकेतस्थळावर ''पुणे विद्यापीठात प्राध्यापक व्हायचंय मग १ कोटी रुपये तयार ठेवा; भरती प्रक्रियेत झोल झाल्याचा आरोप'' या मथळ्याखाली प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदर वृत्तवाहिनीवरील वृत्तांकनामध्ये वाहिनीचे प्रतिनिधी श्री. यशपाल सोनकांबळे यांनी विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष श्री. राहुल ससाणे व इतर एका व्यक्तीच्या वक्तव्यांच्या आधारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १११ शिक्षकी पदांच्या भरतीप्रक्रियेमध्ये महाघोटाळा झाला असून सहायक प्राध्यापक पदावर नियुक्तीसाठी रु.१ कोटीची लाच मागितली जात असल्याबाबत खोटे कथन करण्यात आले आहे. हेच वृत्तांकन श्री. राहुल ससाणे व इतरांनी समाज माध्यमांवरदेखील प्रसारित केले आहे.

**सदर वृत्तांकनातील तपशील निखालस खोटा असून विद्यापीठाची हेतूपुरस्सर बदनामी करणारा आहे. सदर खोट्या व बदनामीकारक वृत्तांकनामुळे व त्याच्या प्रसारणामुळे विद्यापीठाची प्रतिमा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नाहक मलीन होत आहे. सदर आरोपांचे विद्यापीठ जाहीर खंडन करत असून अशा प्रकारे विद्यापीठाची प्रतिमा नाहक मलीन करणाऱ्या प्रवृत्तींचा तीव्र निषेध करत आहे.**

सदर भरती प्रक्रियेमध्ये समावेश असलेल्या उमेदवारांनी व इतर समाज घटकांनी यावर विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात येत आहे. विद्यापीठाच्या सदर बदनामीला जबाबदार असलेल्या सर्व व्यक्तींविरुध्द तसेच सदर वृत्तवाहिनीविरुध्द विद्यापीठाकडून उचित कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.